





दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०३ ● अंक : ०६१ ● पुणे ● गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराच्या ७० कार्यकर्त्यांकडून रक्तदान 3



"पोटावर पाय देऊ नका हो मायबाप सरकार!" 4

## ठळक बातम्या

### विवाहाच्या अमिषाने तरुणीवर बलात्कार

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहराच्या कोंढवा भागात राहणाऱ्या एका अल्पवयीन तरुणीवर विवाह करण्याचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये अनिकेत राकेश निकाळजे (वय २१, रा. एसआरए वसाहत, कमेला, कोंढवा) या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला पोलीसांनी अटक केली आहे.

### निवडणुकीकरिता कट्टर विरोधक एकत्र

पुणे (आरंभ पर्व) : एकमेकांच्या कुटुंबाचा जाहीरपणे उध्दार करणारे नेते दौंड नगरपालिका निवडणुकीसाठी एकत्र आल्याने शहरात सध्या त्याचीच जोरदार चर्चा सुरू आहे. प्रेमसुख कटारिया यांचे नागरी हितसंरक्षण मंडळांच्या आश्रयाला आता या मंडळाला कायम विरोध करणारे आले आहेत. कारण, राज्यातील सत्ताधारी भाजपने नागरी हितसंरक्षण मंडळाला आपल्या पदराखाली घेतले आहे. मागील दोन वर्षांत एकमेकांची उणीदुणी काढून व कुटुंबांचा उद्धार करून तसेच न्यायालयीन प्रक्रियेत विकासकामांना अडवून त्या कामावर मनाई आणून एकमेकांच्या तंगड्या पिरगळणारे, विकासकामांना खीळ घालणारे नेते निवडणुकीसाठी एकत्र आल्याने अनेक निष्ठावंत नाराज झाले आहेत. कोणीही आयरा-गयरा येतो व मला तिकीट पाहिजे, पाच-पन्नास लोकांचा जमाव-युवक बरोबर आणतो व मला तिकीट द्या, असे म्हणतो. त्यामुळे प्रेमसुख कटारिया आणि भाजपचे आमदार राहुल कुल त्रस्त झाले आहेत. दौंड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद हे महिला ओबीसीकरिता राखीव असून, यामध्ये फारसा कोणी रस दाखविलेला नाही असे आजचे तरी चित्र आहे. दौंड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एका बाजूला नागरिक हितसंरक्षण मंडळ, भाजप, आरपीआय आघाडी, पीपल्स रिपब्लिकन पार्टी व इतर मित्रपक्ष आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून शिवसेना, काँग्रेस व इतर त्यांचे छोटे मित्रपक्ष दुसऱ्या बाजूला आहेत.

# परवानगीशिवाय 'प्री-वेडिंग शूट'

## प्रशासनाचा संताप, कपलवर कारवाईची तयारी; सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल

- मेट्रो स्थानक आणि ट्रेनमध्ये अनधिकृत शूट करणाऱ्या कपलला नियमांनुसार दंडाची कारवाई होणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एका जोडप्याने परवानगी न घेता आणि मेट्रो कर्मचाऱ्यांचे न ऐकता, मेट्रो स्थानक परिसर आणि मेट्रो ट्रेनमध्ये जोरदार प्री-वेडिंग फोटोशूट केल्याचा प्रकार समोर आला आहे. याचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, यामुळे मेट्रो प्रशासनाने तीव संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने अनेक जोडपी हटके प्री-वेडिंग शूटसाठी वेगवेगळ्या जागा निवडत आहेत. याच नादात एका कपलने थेट पुणे मेट्रो स्टेशनवर आणि ट्रेनच्या आतमध्ये फोटोशूट करण्याचे 'साहस' केले.

या जोडप्याने फोटोशूट करण्यासाठी मेट्रो प्रशासनाची कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नव्हती. शूट सुरू असताना मेट्रो स्टेशनवरील कर्मचाऱ्यांनी त्यांना अनाउन्स करून थांबवण्याचा प्रयत्न केला. परंतु, या जोडप्याने आणि त्यांच्या सोबतच्या फोटोग्राफरने कर्मचाऱ्यांचे म्हणणे साफ धुडकावून लावले आणि आपले शूट सुरूच ठेवले.

या अनधिकृत शूटिंगचा व्हिडीओ व्हायरल झाल्याचे लक्षात येताच पुणे मेट्रो प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली. 'ज्या कपलने आणि त्यांच्या टीमने मेट्रोमध्ये अनधिकृतपणे शूटिंग केले आहे, त्यांच्यावर लवकरच नियमानुसार कडक कारवाई केली जाईल,' अशी माहिती मेट्रो प्रशासनाने दिली आहे.

लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरलेला हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरत आहे, परंतु परवानगीशिवाय सार्वजनिक मालमत्तेचा अशा प्रकारे वापर करणे जोडप्याला चांगलेच महागात पडले आहे. मेट्रो कायद्यानुसार त्यांच्यावर दंड आकारला जाऊ शकतो किंवा नियम मोडल्याबद्दल कायदेशीर कारवाई होऊ शकते.



## पक्षाने दुर्लक्ष केल्यास बोलल्याशिवाय राहणार नाही!

### प्रदीप गारटकरांचा अजित पवारांना इशारा

**इंदापूर (दै. आरंभ पर्व)**

इंदापूरच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीवरून इंदापुरात मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. इंदापूरचे माजी उपनगराध्यक्ष भरत शहा यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेऊन राष्ट्रवादीच्या चिन्हावर उमेदवारी देण्यास जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांच्या समर्थकांनी प्रचंड विरोध दर्शविला आहे. पक्षाने गारटकर समर्थकविरोधी भूमिका घेतली तर मात्र इंदापूरमध्ये प्रदीप गारटकर आपल्या पदाचा राजीनामा देऊन पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत.

बुधवारी (दि. 12) पुण्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत यासंदर्भात झालेल्या चर्चेनंतर सायंकाळी इंदापूर शहरातील गारटकर यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांची बैठक पार पडली आणि या बैठकीत गारटकर यांनी आपली रोखठोक भूमिका मांडली आहे. पक्षाने आपल्या विरोधी निर्णय घेतला तर स्थानिक आघाडी करून निवडणुकीच्या आखाड्यात उतरू, उमेदवारी दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाट बघू आणि राजीनामा देऊ. जर पक्षाने आमचं ऐकलं, योग्य सन्मान ठेवला तर आम्ही घड्याळावर आहोत, पक्षाने जर आमच्याकडे दुर्लक्ष केले तर आम्ही बोलल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशाराच इंदापुरातून जिल्हाध्यक्ष गारटकरांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांसह इंदापूरचे आमदार तथा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिला आहे.

आम्ही विधानसभा निवडणूक लढवली, त्यामध्ये 75 हजार मते मला मिळाली होती. त्यानंतरच्या काळात अनेक विरोधकांचे वैर पत्करून कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवडून आणले. तुम्हाला आमदार केलं नसतं तर तुम्ही राजकारणात मोठे झालाच नसता. अहंकाराने, पैशाने राजकारण करणे योग्य नाही.

माझ्या मनात नगराध्यक्षपद मिळविणे नाही तर सामान्य कार्यकर्त्याला उभे करून त्याच्या पाठीमागे जनशक्ती एकवटून इंदापूरचा विकास करायचा आहे, असेही ते म्हणाले.

### माजी मंत्री बाळा भेगडेंचा शेळकेंच्या फॉर्म्युलाला विरोध

# लोणावळ्यात महायुती तुटण्याची शक्यता



**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

लोणावळा नगरपरिषदेबाबत महायुतीमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आमदार सुनील शेळकेंच्या अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर माजी मंत्री बाळा भेगडे आणि माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव यांनी आक्षेप घेतला आहे. अडीच- अडीच वर्षांच्या फॉर्म्युलाला त्यांनी विरोध दर्शविला आहे. लोणावळ्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची दिशाभूल करू नये असं आवाहन माजी मंत्री बाळा भेगडे यांनी आमदार सुनील शेळके यांना केलं आहे. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेबाबत महायुतीचा फॉर्म्युला आहे. तो तेवढा पुरता मर्यादित आहे. लोणावळा नगरपरिषद आणि वडगाव मावळ नगरपंचायत बाबत निर्णय झालेला नाही. तो केवळ तळेगाव दाभाडे नगरपरिषदेबाबत शिक्कामोर्तब होता. लोणावळ्याबाबत स्थानिक भाजप निर्णय घेईल. अस माजी मंत्री बाळा भेगडे यांनी स्पष्ट सांगितलं आहे. लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. शेळकेंच्या फॉर्म्युला विरोध केला आहे. फॉर्म्युलाबाबत आमचं एकमत नाही. अस स्पष्ट त्यांनी सांगितलं आहे. आमदार सुनील शेळके यांनी लोणावळ्यातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नाही. शेळके यांनी आम्हाला सोडून सर्वांना बोलावले. लोणावळ्यात ज्या बैठका झाल्या त्या बैठकीला भाजप पदाधिकाऱ्याला बोलावले नाही. हे सर्व पाहता लोणावळ्यात महायुती काही आलबेल नाही. ऐकला चलो चा नारा देण्याची ही शक्यता नाकारता येत नाही.

## समीर पाटील यांच्यावर आरोप करण्याबाबत धंगेकरांना मनाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'कोथरूडमधील व्यावसायिक समीर पाटील यांच्याबाबत माजी आमदार, शिवसेनेचे (शिंदे गट) महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी आरोप करू नयेत,' असे मनाई आदेश न्यायालयाने दिले आहेत. धंगेकर यांनी आमदार, उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, तसेच समीर पाटील यांच्यावर नुकतेच आरोप केले होते. त्यानंतर समीर पाटील यांनी धंगेकर यांच्याविरुद्ध अब्रुनुकसानीचा दावा न्यायालयात दाखल केला होता. पाटील यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्यावर वरिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश के. आर. सिंघल यांच्या न्यायालायात सुनावणी सुरू आहे. पाटील यांच्याबाबत कोणतेही मानहानीकारक विधान, तसेच आरोप करू नयेत, असे आदेश न्यायालयाने धंगेकर यांना दिले आहेत. कोथरूड गोळीबार प्रकरणात गुंड नीलेश घायवळ याच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घायवळ सध्या लंडनमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. घायवळ याने बनावट कागदपत्रांचा वापर करुन पारपत्र मिळविले होते. त्यानंतर याप्रकरणात धंगेकर यांनी चंद्रकांत पाटील आणि समीर पाटील यांच्यावर कोथरूडमधील वाढत्या गुन्हेगारीबाबत आरोप केले होते. पाटील यांचे घायवळ याच्याशी संबंध असल्याचा आरोप धंगेकर यांनी केला होता. त्यानंतर समीर पाटील यांनी धंगेकर यांच्याविरुद्ध ५० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा न्यायालयात दाखल केला.



# आळंदी यात्रा : पीएमपीची 'जादा' सेवा महागात


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कार्तिकी एकादशी आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदी यात्रेसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) जादा बस उपलब्ध करून दिल्या आहेत. १३ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत मार्गावरील १३३ आणि जादा २२९ अशा एकूण ३६२ बस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

१५ ते १७ नोव्हेंबर या तीन दिवसांसाठी रात्री बससेवा गरजेनुसार चालवली जाईल, तर इतर दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत सेवा राहील. भाविकांच्या सोयीसाठी आळंदी गावातील सध्याचे बसस्थानक काटेवस्ती येथे स्थलांतरित करण्यात आले असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. मात्र, या विशेष सेवेंतर्गत रात्री १० वाजल्यानंतर १० रुपये जादा प्रवासी तिकीट आकारण्यात येणार आहे. तसेच, एका दिवसाचा, साप्ताहिक, मासिक, ज्येष्ठ नागरिक आणि इतर पासधारकांनाही त्यांचे पास रात्री १०नंतर वापरता येणार नाहीत. यात्राकाळात भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पीएमपीने शहरातील विविध भागांतून आळंदीला जाणाऱ्या बस वाढवल्या आहेत. स्वारगेट, हडपसर, पुणे स्टेशन, महापालिका भवन, निगडी, पिंपरी, चिंचवड, देहूगाव, भोसरी आणि रहाटणी या १० स्थानकांवरून जादा बससेवा उपलब्ध असेल. या सर्व ठिकाणांहून १५ ते १७ नोव्हेंबरदरम्यान रात्री सेवा उपलब्ध असेल. १३, १४ आणि १८ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत बस धावतील.

यात्रा काळात गर्दीमुळे अनेक मार्गांवर बदल करण्यात आले आहेत. काही बस मार्गिकांच्या मुख्य स्थानकांच्या संचलनाचे मुख्य स्थानकांमध्येही स्थलांतर करण्यात आले आहे. त्यानुसार स्थानिक आणि प्रवाशांनी या बदलांना सहकार्य करावे,असे आवाहन पीएमपी प्रशासनाकडून करण्यात आले. यात्रेसाठी जादा बस उपलब्ध करण्यासाठी शहरातील काही नियमित बस मार्गांवरून बस कमी करून या विशेष सेवेसाठी देण्यात आल्या आहेत. परिणामी, आळंदी बसस्थानकावरून संचालित होणारे मार्ग क्रमांक २६४ (भोसरी ते पाबळ), २५७ (आळंदी ते मरकळ) आणि ३६४ (आळंदी ते चाकण आंबेठाण चौक) हे तीन मार्ग यात्राकाळात बंद राहतील.

पीएमपीने आळंदी यात्रेतील गर्दीमुळे या मार्गावर जादा पीएमपी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. रात्री उशिरापर्यंत ही सेवा सुरू असल्याने मनुष्यबळ, इतर मार्गांवरील मिळकतीचे नियोजन आणि त्यानुसार नियोजन या दृष्टीने रात्री दहानंतर १० रुपये जादा शुल्क आकारण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.



# तुझ्या गळा, माझ्या गळा !

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे भारतावरचे प्रेम पुन्हा एकदा उफाळून आले आहे ! अमेरिकेने भारतावर जे पन्नास टक्के टॅरिफ लादले होते, ते कमी केले जाईल, असे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत. एवढेच म्हणून ट्रम्प थांबले नाहीत. 'भारतीय माझ्यावर नाराज आहेत; पण मला खात्री आहे लवकरच ते माझ्यावर पुन्हा प्रेम करू लागतील !', असेही ट्रम्प म्हणाले आहेत. निमित्त होते, अमेरिकेचे भारतातील नवे राजदूत सर्जियो गोर यांच्या शपथविधीचे. नव्या जबाबदारीसाठी त्यांना सदिच्छा देताना ट्रम्प यांनी भारत-अमेरिका संबंधांचा उल्लेख केला. उभय देशांमध्ये नवा करार लवकरच होईल अशी चिन्हे आहेत. भारत रशियाकडून तेल विकत घेतो, याचा अमेरिकेला त्रास आहे. आता ही खरेदी कमी झाल्यामुळे भारतासोबतचे संबंध सुरळीत होतील असे अमेरिकेच्या अध्यक्षांनी म्हटले आहे. म्हणजे, एकाअर्थाने या संबंधांची ती पूर्वअटसुद्धा आहे.

जगाची एकपंचमांश लोकसंख्या भारतात राहते. ही बाजारपेठ अमेरिकेला खुणावते आहे. अमेरिकेतील अनेक उद्योग भारतीय चालवतात. भारताला वगळून जागतिक बाजारपेठेत काही करता येणार नाही, याचे भान ट्रम्प यांना उशिरा का असेना आले हे महत्त्वाचे. मात्र, म्हणून भारतानेही अमेरिकेसाठी लगेच 'रेड कार्पेट' अंथरण्याचे कारण नाही. 'अमेरिका फर्स्ट' असे म्हणताना ट्रम्प यांना अमेरिकेशिवाय अन्य कोणाचाही विचार करायचा नसतो. ट्रम्प यांच्या स्वार्थांध आणि संकुचित भूमिकेमुळे जगाला धोक्याच्या वळणावर उभे केले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या बेमुर्वतखोर धोरणांमुळे एक मात्र झाले. या दादागिरीला उत्तर देण्यासाठी अनेक देश एकवटू लागले. याच पार्श्वभूमीवर शांघाय सहकार्य संघटनेची शिखर परिषद झाली होती. जगातील निम्मी लोकसंख्या या संघटनेमध्ये आहे. भारत, चीन आणि रशिया एकत्र आले तर जगाचे प्राक्तन बदलू शकते. अमेरिकेच्या दबावाखाली न जाता पर्याय शोधण्याचा निर्णय भारताने घेतला. जपान, चीन, रशिया यांच्याशी भारताचा संवाद सुरू आहे.



त्यामुळे ट्रम्प भडकले. आता मात्र ते सामोपचाराची भाषा करत आहेत. साम-दाम-दंड-भेदचा वापर ट्रम्प करतात. मात्र, त्यांचा क्रम उलटा असतो. सुरुवातीला ते फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. मग धमकावतात. मग दंड लादतात. मग लालूच दाखवतात. हे सगळे करूनही भारत आपल्यासोबत येत नाही, हे समजल्यावर आता ट्रम्प प्रेमाची भाषा करू लागले आहेत. ट्रम्प परवा म्हणाले, 'भारत हा सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. अमेरिकेचा महत्त्वाचा आर्थिक आणि सामरिक भागीदार

आहे !- त्यांनी भारतावर तेल खरेदीमुळे पंचवीस टक्के दंडात्मक टॅरिफ लावले. हा दंड आणि इतर 'रेसिप्रोकल टॅरिफ' मिळून एकूण पन्नास टक्के आयात शुल्क झाले आहे. आता भारत आणि अमेरिका एका मोठ्या व्यापार कराराच्या उंबरठ्यावर आहेत. अमेरिकेची सोबत आपल्याला हवी आहेच. मात्र, आपले सार्वभौमत्व अधोरेखित करत ! या पार्श्वभूमीवर भारताने काही महत्त्वाच्या मागण्या ठामपणे मांडणे आवश्यक आहे. रशियन तेल खरेदीवरील पंचवीस टक्के दंड रद्द करण्यावर भर द्यावा. दुसरा मुद्दा म्हणजे, ट्रम्प प्रशासनाने लावलेल्या 'रेसिप्रोकल टॅरिफ'वर टप्प्याटप्प्याने सवलत मिळवण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे, भारतीय वस्तूंसाठी अमेरिकी बाजारपेठ खुली होईल आणि अमेरिकी गुंतवणूकदारांनाही भारतात संधी मिळेल. उच्च तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि डिजिटल व्यापार क्षेत्रांमध्ये अमेरिकेसोबत सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. कृषी, औषध आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय कंपन्यांना अधिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न भारताने करावा.

गेल्या काही वर्षांत भारत-अमेरिका संबंध केवळ व्यापारापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. संरक्षण, तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, शिक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांत दोन्ही देशांमध्ये अभूतपूर्व सहकार्य वाढले आहे. आर्थिक सहकार्य वाढवणे, गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे आणि तंत्रज्ञान-संरक्षण क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट करणे या आघाड्यांवर दोन्ही देशांची पावले एकाच दिशेने पडली, तर जगाचा राजकीय आणि आर्थिक नकाशा बदलू शकतो. ट्रम्प यांच्या नव्या सुरातून त्या बदलाची चाहूल मिळू लागली आहे. आधी गळा पकडणारे ट्रम्प आता 'तुझ्या गळा, माझ्या गळा' आळवू लागले असतील, तर आपल्याला हव्या असणाऱ्या मोत्यांच्या माळा भारतानेही गुंफून घ्यायला हव्यात !

# मोफत शिर्डी यात्रा सोहळ्याचा पहिला टप्पा उत्साहात

## काकासाहेब चव्हाण व अनिता इंगळे यांनी केले आयोजन



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 33 मध्ये माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण आणि माजी जिल्हा परिषद सदस्य अनिता इंगळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत शिर्डी यात्रा सोहळ्याचा पहिला टप्पा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला.

या यात्रेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्षाचे) अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी व नेते उपस्थित राहून भाविकांचे उत्साहाने स्वागत केले. या पहिल्या टप्प्यात खडकवासला, किरकटवाडी, नांदोशी, कोल्हेवाडी, सणसनगर आणि नांदेड परिसरातील सुमारे १५०० भाविक भक्तांनी सहभागी होत साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. यात्रेचे नियोजन, व्यवस्थापन आणि सर्व सोयीसुविधांची काळजी उत्कृष्टपणे घेतल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

शिर्डी यात्रेनंतर सर्व भाविकांनी काकासाहेब चव्हाण आणि अनिता इंगळे यांचे मनःपूर्वक आभार मानले. "महिलांसाठी अशी मोफत यात्रा आयोजित करून आम्हाला साईंचे दर्शन घडवले, हे आमच्यासाठी खरोखरच अनमोल क्षण आहेत," असे अनेक भाविकांनी सांगितले.

या उपक्रमामुळे प्रभागात श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश पोहोचला आहे. आगामी रविवारी दुसऱ्या टप्प्यात २५०० ते ३००० भाविक सहभागी होणार असून, नागरिकांमध्ये या यात्रेबाबत प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.

समाजसेवेचा आणि भक्तिभावाचा संगम असलेला हा उपक्रम काकासाहेब चव्हाण आणि अनिता इंगळे यांच्या पुढाकाराने प्रभागातील नागरिकांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. यावेळी महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# सिग्नेचर ग्लोबलच्या स्टॉकमध्ये ७५% पर्यंत वाढ अपेक्षित

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
रिअल इस्टेट क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडच्या समभागात गुंतवणूकदारांना मोठी वाढीची संधी दिसत आहे. देशातील तीन प्रमुख ब्रोकरेज फर्म्सनी – आयसीआयसीआय सिक्युरिटीज, ॲक्सिस कॅपिटल आणि नुवामा – कंपनीची स्थिर व्यवसाय गती आणि दीर्घकालीन वाढीची क्षमता लक्षात घेऊन या स्टॉकसाठी 'खरेदी' (बाय) रेटिंग कायम ठेवली आहे. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १,०२९.९० रुपयांवर उघडलेल्या या समभागासाठी आयसीआयसीआय सिक्युरिटीजने १,७८६ रुपये, तर ॲक्सिस कॅपिटलने १,७८० रुपये आणि नुवामाने १,३७६ रुपयांचे लक्ष्य दिले आहे. या लक्ष्य किमतींमुळे सिग्नेचर ग्लोबलच्या स्टॉकमध्ये ७५% पर्यंत वाढ होण्याची शक्यता दिसून येते. सिग्नेचर ग्लोबलने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत ४६.६ अब्ज रुपयांची पूर्व विक्री नोंदवली असून १२.० अब्ज रुपयांचा महसूल नोंदवला आहे. कंपनीची एकूण वसुली १८.७ अब्ज रुपयांची इतकी आहे. ब्रोकरेज फर्म्सच्या मते, कंपनीच्या यशाचा मोठा आधार म्हणजे परवडणाऱ्या आणि मध्यम उत्पन्न गृहनिर्माण विभागात आर्थिक वर्ष २१ ते २५ दरम्यान नोंदवलेला ५७% चा मजबूत सीएजीआर (वार्षिक एकत्रित वृद्धिदर) विक्री बुकिंग आहे.

# खा. मुरलीधर मोहोळ : रक्तदान शिबिरात १८५ जणांचे रक्तदान

## प्रभाग क्रमांक ३३ मध्ये फिरते आरोग्य तपासणी शिबिर : माजी सरपंच संतोषदादा मते यांचा अभिनव उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुण्याचे भूषण आणि केंद्रीय राज्यमंत्री तसेच खासदार मा. श्री मुरलीधर (अण्णा) मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त श्री संतोष उर्फ दिवाकर शिवाजी मते (मा. सरपंच खडकवासला) यांच्या वतीने प्रभाग क्रमांक 33 शिवणे–खडकवासला–धायरी येथे व्हिजन क्रिकेट अकॅडमी ग्राउंडवर "रक्तदान संकल्प दिवस" या उपक्रमाअंतर्गत भव्य रक्तदान शिबिर आणि मोफत फिरते आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.



उत्सवमूर्ती मा. मुरली अण्णा मोहोळ यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन अत्यंत समर्पक आणि भावनिक वातावरणात झाले. या प्रसंगी प्रभाग क्रमांक 34 च्या वतीने श्री विशालजी उभे यांनी उपस्थिती दर्शवून उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे अनेक कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये अविनाशजी चरवड, सचिनजी दांगट, ममताताई दांगट, किशोरजी पोकळे, अश्विनीताई पोकळे, अनिलभाऊ मते, दत्तात्रय कोल्हे, किरणजी हगवणे, काजल हगवणे, पैलवान तुषार पोकळे, कोमल कुटे, महेश घुले, राहुल मोरे, तेजस हगवणे, साहिल मते, महेश कराडे, महेश मते, पृथ्वीराज भिंताडे, राहुलजी ढमाले, गणेश दिघे आदी मान्यवरांचा सहभाग लाभला.

मा. मुरली अण्णा मोहोळ यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देताना सांगितले की, "रक्तदान आणि आरोग्य तपासणी ही समाजसेवेची खरी साधना आहे. अशा उपक्रमांतून समाजात एक सकारात्मक संदेश जातो."

कार्यक्रमाचे आयोजक संतोष दादा मते यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच या उपक्रमात रक्तदान करून आपले योगदान देणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# खामगाव (मावळ)मध्ये रस्ता काँक्रीटीकरण कामाचे उद्‌घाटन उत्साहात

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
हवेली तालुक्यातील खामगाव मावळ, मोगरवाडी आणि माळवाडी या गावांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांना खराब रस्त्यांमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र नागरिकांची ही लक्षात घेता आमदार भिमराव तापकीर यांच्या विकासनिधीतून रस्ता काँक्रीटीकरणाचे काम मंजूर झाले.



अखेर आज या कामाचे भव्य उदघाटन ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. या उदघाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शरद (लालाशेठ) जावळकर, अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा, खडकवासला मतदारसंघ व माजी सरपंच खानापूर, सौ. संतोषी ताई दारवटकर, सरपंच खामगाव (मावळ) व अध्यक्ष भाजपा महिला आघाडी, खडकवासला मतदारसंघ ग्रामीण, श्री. प्रशांत दारवटकर, माजी सरपंच, श्री. अतिश थोपटे, विनोद पवार, अनिल दारवटकर, राहूल भोसले, तसेच श्री. कुमार दारवटकर (ग्रामपंच सदस्य) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मीटिंग कार्यक्रम संपन्न झाला .यावेळी ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. गावकऱ्यांनी आमदार भिमराव तापकीर यांचे मनापासून आभार मानले आणि या कामामुळे गावात खऱ्या अर्थाने विकासाची गंगा वाहू लागली असल्याचे सांगितले. रस्ता काँक्रीटीकरण झाल्याने खामगाव, मोगरवाडी आणि माळवाडी परिसरातील दळणवळण सोयीस्कर होणार आहे. पावसाळ्यात चिखल आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासातून आता सुटका मिळणार आहे. या विकासकामामुळे गावाच्या प्रगतीला गती मिळेल आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा बदल घडेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### किल्ले बांधणी स्पर्धेत आयुष प्रथम

**पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीच्या निमित्ताने निगडे मोसे (ता. राजगड) येथे सुदर्शन तरुण मंडळ व मावळा जवान संघटनेचे कार्याध्यक्ष रोहित नलावडे आणि शेखर नलावडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या किल्ले बांधणी स्पर्धेत आर्यन संभाजी कोकाटे याने प्रथम क्रमांक पटकावला. रविवारी (दि. ९ नोव्हेंबर) या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. आर्यनला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक म्हणून सायकल देण्यात आली. या स्पर्धेत ५० हून अधिक विद्यार्थी व युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला होता. सर्व स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी ग्रामस्थ, युवक कार्यकर्ते आणि आयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

### २० नोव्हेंबरपासून iQOO १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा




**नवी दिल्ली (आरंभ पर्व) : उच्च-कार्यक्षमता असलेला स्मार्टफोन ब्रँड, iQOO 26 नोव्हेंबर रोजी iQOO 15 लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके स्थापित करत, iQOO 15 प्रीमियम कामगिरीसह प्रगत कॅमेरा, सॉफ्टवेअर क्षमता आणि AI क्षमता, एक आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञानाचा मेळ घालते जे एक अतुलनीय स्मार्टफोन अनुभव प्रदान करते. iQOO 15 ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये iQOO TWS 1e इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील. iQOO 15 मध्ये Samsung 2K M14 LEAD™ OLED डिस्प्ले आहे, जो Android साठी पहिला आहे. ते 2K रिझोल्यूशन, 144Hz ॲडॉप्टिव्ह रिफ्रेश रेट आणि अल्ट्रा-व्हिव्हिड क्लॅरिटीसाठी 6000 निट्स लोकल पीक ब्राइटनेस देते. 2600 निट्स (HBM) ब्राइटनेससह, हा भारतातील सर्वात तेजस्वी डिस्प्ले देखील आहे. शिवाय, iQOO 15 मध्ये डॉल्बी व्हिजन आणि त्वरित ब्राइटनेस समायोजनासाठी ट्रिपल एम्बियंट लाइट सेन्सर येतो, ज्यामुळे प्रत्येक फ्रेम इमर्सिव्ह आणि वास्तववादी वाटते.**

### तरूण मधुमेहींनी आपल्या डोळ्यांची अधिक काळजी घ्यावी : तज्ञ

**पुणे (आरंभ पर्व) : किशोरवयीन आणि तरूण व्यक्तींमध्ये टाईप 2 मधुमेहाचे वाढते प्रमाण पाहता त्याच्याशी निगडीत गुंतागुंत देखील आयुष्यात खूप आधी उद्भवू शकतात. साखरेचे प्रमाण नीट व्यवस्थापित केले नाहीत,तर त्याचा विपरीत परिणाम डोळ्यांवर होऊ शकतो.त्यामुळेच तरूण मधुमेहींनी आपल्या डोळ्यांची अधिक काळजी घ्यावी असे मत तज्ञांनी व्यक्त केले. मधुमेहाबाबत आता समाजामध्ये जागरूकता निर्माण झाली असली तरी याचा डोळ्यांवर होणारा परिणाम यांबाबत अनेक लोकांना पुरेशी माहिती नसते.**

# 'आयथ्राइव्ह सिम्पोजियम २०२५' परिषदेचे पुण्यात आयोजन

## 'आरोग्यसेवेच्या भविष्याचा नव्याने विचार' या अनोख्या थीमअंतर्गत डॉक्टर, वैज्ञानिक, संशोधक आणि विचारवंत आदी या परिषदेत सहभागी होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
'आयथ्राइव्ह' तर्फे 'सिम्पोजियम २०२५' या आगळ्यावेगळ्या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान, निसर्ग आणि चेतना यांच्या अद्भुत संगमातून आधुनिक आरोग्यसेवेची नवी व्याख्या साकार करणारा हा आगळा-वेगळा उपक्रम ठरणार आहे.'आरोग्यसेवेच्या भविष्याचा नव्याने विचार' या अनोख्या थीमअंतर्गत डॉक्टर, वैज्ञानिक, संशोधक आणि विचारवंत आदी या परिषदेत सहभागी होऊन पारंपरिक आरोग्यव्यवस्थांना आव्हान देऊन नव्या उपचारपद्धती आणि समग्र दृष्टिकोनाचा वेध घेणार आहेत.




हा कार्यक्रम पारंपरिक वैद्यकीय चर्चेपलीकडे जाऊन भविष्यातील आरोग्यजगताला आकार देणाऱ्या महत्त्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रित करणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित वैद्यकीय नवकल्पना, लिम्फॅटिक आरोग्य, माइटोकॉन्ड्रियल पोषण, उपचारातील चेतनेची भूमिका, आधुनिक विज्ञानाद्वारे प्रमाणित प्राचीन ज्ञान आणि भारतासाठी सुसंगत आरोग्यमानके यांसारख्या विषयांवर परिषदेत सखोल चर्चा होणार आहे.

'सिम्पोजियम २०२५' हा उपक्रम कार्यक्रम येत्या शनिवारी (१५ नोव्हेंबर २०२५) 'सिम्बायोसिस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर', लवळे, पुणे येथे होणार आहे. सर्व उपस्थितांना डिजिटल ई-प्रमाणपत्रे देण्यात येतील. याशिवाय वक्ते आणि पॅनेल सदस्यांना त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विशेष प्रमाणपत्रांनी गौरवण्यात येणार आहे.

**काय अपेक्षित आहे?**

१) प्रभावी व्याख्याने : हृदयविकार उपचारांचे पुनर्निर्धारण, लिम्फॅटिक प्रणालीचे विश्लेषण, श्वासाच्या वारंवारतेचे विज्ञान, उपचारातील चेतनेचे स्थान, प्राचीन आणि आधुनिक औषधशास्त्र यांचा संगम या आणि अशा अनेक विषयांवर ११ ख्यातनाम वक्ते त्यांचे क्रांतिकारी विचार सादर करतील.

२) पॅनेल चर्चा : 'Future in Focus: Building the Healthcare We Deserve' या विषयावर विचारमंथन सत्र होईल. येथे विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ तंत्रज्ञान, जागरूकता आणि एकात्मिक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून आरोग्याचा अनुभव कसा अधिक समृद्ध करता येईल, यावर चर्चा करतील.

३) आधुनिक संवाद आणि प्रत्यक्ष शिक्षण : तंत्रज्ञान आणि परंपरा; तसेच प्रतिबंध आणि अचूकता यांचा संगम घडेल, अशी थेट चर्चासत्रे, केस स्टडीज आणि वास्तविक जीवनातील उपयुक्त अनुभव सादर केले जातील.

४) तज्ज्ञांशी नेटवर्किंग : डॉक्टर, फंक्शनल न्यूट्रिशनिस्ट आणि आरोग्य क्षेत्रात नवकल्पना घडवणारे इनोव्हेटर्स यांच्याशी थेट संवादाची संधी.

५) सिम्पोजियम अनुभव केंद्रे : आइस बाथ, रेड लाइट थेरपीसारखी आकर्षक इन्स्टॉलेशन्स आणि अत्याधुनिक हेल्थटेक गॅझेट्स असलेली इंटरॅक्टिव्ह अनुभव केंद्रे; कारण निरोगी राहणे हे कंटाळवाणे असण्याची गरज नाही.

'आयथ्राइव्ह'च्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मुग्धा प्रधान म्हणाल्या, की 'खूप काळापासून आरोग्यसेवा म्हणजे केवळ आजारांवर प्रतिक्रिया देणे, लक्षणांवर उपचार करणे आणि त्यालाच प्रगती म्हणणे इतकेच मर्यादित राहिले आहे. मात्र, भविष्य याहून खूप मोठे आहे आणि ते म्हणजे एकात्मता. जिथे वैद्यक, तंत्रज्ञान, शिक्षण आणि वेलनेस हे विषय स्वतंत्र नाहीत, तर परस्परपूरक आहेत. हाच या वर्षीच्या 'आयथ्राइव्ह सिम्पोजियम'चा आत्मा आहे. हा केवळ एका दिवसाचा कार्यक्रम नसून, परिवर्तनाचा प्रवास आहे; जिथे दृष्टिकोन असलेले विचारवंत जुनाट आरोग्यव्यवस्थेला आव्हान देऊन आरोग्यसेवेचे भविष्य नव्याने निर्माण करणार आहेत.

जे भविष्य सक्रिय, वैयक्तिक आणि मानवी मूल्यांनी समृद्ध असेल. येथे तुम्ही धाडसी कल्पना अनुभवाल, क्रांतिकारक उपाय पाहाल आणि अशा चर्चांचा भाग बनाल ज्या केवळ आरोग्यसेवेचे भविष्य भाकीत करत नाहीत, तर ते घडवतात. त्यामुळे हा फक्त एक इव्हेंट नसून, नव्या, पुनर्कल्पित आरोग्ययुगाचा आरंभ असेल.'




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५









## नऱ्हेत रंगणार महिला भगिनींचा होम मिनिस्टर

## खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रम

### खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांच्यातर्फे आयोजन

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

दिवाळीच्या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी खास आनंदाचा कार्यक्रम "न्यू होम मिनिस्टर – खेळ रंगला पैठणीचा!" प्रभाग क्रमांक ३४ (नऱ्हे, वडगाव धायरी) येथे आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमाचे आयोजन खडकवासला भाजपाचे सरचिटणीस श्री. बापूसाहेब पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच श्री संकल्प फाउंडेशनच्या कार्याध्यक्षा सौ. प्रितीताई पोकळे यांच्या संयोजनाखाली करण्यात आले आहे.

या दोघांच्या पुढाकारामुळे महिलांसाठी आनंद, मैत्री आणि सन्मानाचा हा सुंदर उपक्रम साकार झाला आहे. महिलांसाठी विविध




खेळ, पैठणीचा सोहळा, आकर्षक बक्षिसे आणि स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रथम "होम मिनिस्टर" विजेत्यास चेतक स्कूटी होम थिएटर, कुलर, LG ओव्हन, शिलाई मशीन, फूड प्रोसेसर, गॅस शेगडी, इलेक्ट्रिकल शेगडी अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. सर्व विजेत्या महिलांना खास पैठणी साडी भेट म्हणून देण्यात येईल.

लकी ड्रॉमध्ये स्कूटी, सॅमसंग फ्रिज, पिठाची चक्की, गिझर, वॉटर प्युरीफायर, होम थिएटर, इस्त्री, फॅन, मिक्सर अशी उपयुक्त बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ७ वाजताb किशोरी प्रांगण मानाजी नगर , नऱ्हे गाव येथे होणार असून निवेदन प्रसिद्ध निवेदक क्रांतीनाना मळेगावकर करणार आहेत.

या कार्यक्रमात हजारो महिला भगिनी सहभागी होणार असल्याने परिसरात सणासारखे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री. बापूसाहेब पोकळे आणि सौ. प्रितीताई पोकळे यांच्या नेतृत्वामुळे हा कार्यक्रम फक्त प्रभाग क्रमांक ३४ पुरता मर्यादित न राहता संपूर्ण मतदारसंघात लक्षवेधी ठरत आहे.

महिलांच्या उत्साहाने उजळलेला हा सोहळा म्हणजे खऱ्या अर्थाने आनंद, एकता आणि सन्मानाचा सण ठरणार आहे. या कार्यक्रमासाठी खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर,भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी नगरसेविका मोनिकाताई मुरलीधर मोहोळ या उपस्थित राहणार आहेत. महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित काऊन कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन. श्री.आयोजक बापूसाहेब पोकळे यांनी केले आहे.

## बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडकडून घोटाळ्याचा पर्दाफाश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे ₹25 कोटींच्या मोटर ॲक्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद (MACT) मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली. भारतीय दंडविधान संहिता आणि मोटर वाहन कायदा अंतर्गत साणंद पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल केलेल्या कथित वाहनचालकाने असा दावा केला होता की, आपण (वाहनचालक) महिंद्रा झायलो हे वाहन चालवित असताना रस्त्यावर समोरुन अचानक कुत्रा आल्याने गाडी पलटली. तसेच त्याने तक्रारीत असे म्हटले होते की, गाडीतील सह-प्रवाशाला अपघातात जीवघेणी दुखापत झाली आणि त्याला साणंद सरकारी रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले. यानंतर, मृतांच्या कायदेशीर वारसांनी भूज येथील MACT समोर ₹25 कोटींचा नुकसानभरपाईचा दावा दाखल केला होता. बजाज जनरल इन्श्युरन्सला न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले होते. तसेच अंतर्गत चौकशीला देखील सुरुवात झाली होती. कंपनीने एफआयआर, चार्जशीट, पोस्ट-मॉर्टम रिपोर्ट, स्पॉट आणि चौकशी पंचनामा आणि वाहनाचे कागदपत्रे मिळविली.

## नॉलेज रिॲल्टी ट्रस्टचे लिस्टिंग नंतर पहिल्या तिमाहीत दमदार निकाल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात मोठी आणि भौगोलिकदृष्ट्या सर्वात विविध ठिकाणी कार्यालये असलेली राईट कंपनी नॉलेज रिॲल्टी ट्रस्टने ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी तिमाही आणि सहामाही निकाल आज जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत १८ लाख चौरस फूटाची दमदार लिजिंग दिली, यामध्ये सरासरी २९ टक्के स्प्रेडवर १२ लाख चौरस फुटाची नवीन लिजिंग आणि ६ लाख चौरस फुटाच्या रिन्यूवल्सचा समावेश आहे. लिजिंगच्या दमदार गतीमुळे, पोर्टफोलिओ ऑक्युपन्सी वार्षिक ३४० बीपीएसने वाढून ९२ टक्के झाली.

## 'प्लॅटिनम लव्ह बँड्स'कडून नवीन कलेक्शनचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जोडप्यांमध्ये कधीही अव्यक्त होणारी भाषा लक्षात घेऊन 'प्लॅटिनम लव्ह बँड्स'ने त्यांच्या नवीन हंगामी संग्रहाचे अनावरण केले. विश्वासात रुजलेल्या प्रत्येक प्रेमकथेची स्वतःची अशी बोलीभाषा असते, जी जगाला समजू शकत नाही. हा संग्रह त्या शांत नात्यांचे रूपांतर तुम्ही परिधान करू शकता अशा गोष्टींत करते, अशी गोष्ट जी तुम्ही आयुष्यभर जपू शकता. ही गोष्ट म्हणजे फक्त अंगठी नाही, ते तुमच्या खासगी भाषेचा भाग आहेत. एका वैयक्तिक बंधनाचे प्रतीक आहेत, फक्त तुम्ही दोघेच त्यांची कहाणी जाणता. ९५ टक्के शुद्ध प्लॅटिनमपासून बनवलेले हे बँड अढळ आणि खरे अनुबंध दर्शवतात, जे धातूच्या ताकद आणि लवचिकतेचे प्रतिबिंब आहेत. दोन मार्गांचे एक होण्याचे प्रतीक असलेल्या आणि गुंफलेल्या रचनेपासून ते प्रत्येक नात्यातील विभिन्नता आणि सुसंवाद कैद करणाऱ्या दुहेरी-रंगछटेच्या



तपशीलांपर्यंत प्लॅटिनम लव्ह बँड कलात्मकता आणि भावनांना समान प्रमाणात एकत्र आणतात. आकर्षक रेषा, कोमल वक्राकार आणि हिऱ्याची लकब अशी कलाकृती तयार करते जी समकालीन आणि कालातीत दोन्ही वाटते, तसेच आधुनिक प्रेमाच्या विकसित होत असलेल्या अभिव्यक्तीला प्रतिध्वनी करते. जोडपे नवीन हंगामाच्या संग्रहातून उत्कृष्टपणे तयार केलेल्या प्लॅटिनम लव्ह बँडच्या श्रेणीतून कोणताही संग्रह निवडू शकतात, प्रत्येक संग्रह त्याच्या दुर्मिळ आणि अद्वितीय प्रेम भाषेला प्रतिबिंबित करतो. जसे की, रिदम ऑफ अस, अस अंटिल इन्फिनिटी, लूप्ड इन लव्ह, ट्विन फ्लेम्स, दी लास्टिंग एम्ब्रान्स, ब्लेंडेड इन लव्ह , इन परफेक्ट सिंक आणि त्या बंधनाचा आदर करण्यासाठी प्लॅटिनमपेक्षा चांगला धातू नाही. ताऱ्यांपासून बनलेला एक मौल्यवान धातू, जगभरातील फक्त निवडक ठिकाणी आढळतो आणि ९५ टक्के तडजोड न करता शुद्धतेत निर्मित होतो.

## थोडक्यात पण महत्वाचे

### फॉग्सी तर्फे गर्भधारणापूर्व आरोग्यावर विशेष "संपूर्णा" मंचाचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) :** द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक ॲन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (फॉग्सी) तर्फे संघटनेच्या संपूर्णा पब्लिक फोरम उपक्रमा अंतर्गत गर्भधारणापूर्व आरोग्यावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम पुणे ऑब्स्टेट्रिक ॲन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) च्या सहयोगाने संपन्न होत आहे. फॉग्सीच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.सुनिता तांदुळवाडकर यांच्या नेतृत्वाखाली गुरूवार,13 नोव्हेंबर 2025 रोजी आयएमए हॉल, टिळक रोड येथे दुपारी 2 ते सायंकाळी 5 दरम्यान हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रसिध्द अभिनेत्री मृण्मयी देशपांडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असतील.14 ते 16 नोव्हेंबर 2025 दरम्यान जे.डब्ल्यू.मॅरिएट येथे फॉग्सी प्रेसिडेंशियल कॉन्फरन्स (अध्यक्षीय परिषद) "स्टार संपूर्णा" याचाच हा कार्यक्रम एक पूर्व भाग आहे. संपूर्णा "सार्वजनिक मंचात फॉग्सीच्या राष्ट्रीय अध्यक्षा व स्टार संपूर्णाच्या संयोजक अध्यक्षा डॉ.सुनिता तांदुळवाडकर ,पीओजीएसचे अध्यक्ष डॉ मनिष माचवे,फॉग्सीच्या राष्ट्रीय सह सचिव डॉअश्विनी काळे,पीओजीएसचे सचिव डॉ.निलेश बलकवडे, डॉ पूजा लोढा ( आयोजक सचिव), कार्यक्रमाचे संयोजक डॉ.वैजयंती पटवर्धन ,डॉ.अलका कुथे, डॉ रेवती राणे तसेच समन्वयक डॉ.आरती निमकर ,डॉ अलका क्षीरसागर ,डॉ संध्या मेश्राम आदी तज्ञ उपस्थित असतील.

## दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराच्या ७० कार्यकर्त्यांकडून रक्तदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजसेवेच्या कार्यात नेहमीच अग्रेसर राहणारे मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री मुरलीधर आण्णा मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात खऱ्या अर्थाने "मानवतेचा उत्सव" अनुभवायला मिळाला. या शिबिरात समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, श्री दत्ताभाऊ कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली मित्र परिवाराच्या वतीने तब्बल ७० कार्यकर्त्यांनी रक्तदान करून माणुसकीचे आणि सामाजिक बांधिलकीचे अद्भुत उदाहरण



निर्माण केले. प्रत्येक रक्तदात्याच्या चेहऱ्यावर समाधानाचा, अभिमानाचा आणि सेवाभावाचा तेज दिसत होता. या विशेष क्षणाला अधिक अर्थ प्राप्त झाला, जेव्हा स्वतः मुरली आण्णा मोहोळ एवढ्या गर्दीतून पुढे येऊन सर्व रक्तदात्यांशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्याबरोबर फोटो घेण्यासाठी आणि त्यांचे आभार मानण्यासाठी पुढे सरसावले. त्यांच्या या मनमिळाऊ वर्तनाने प्रत्येक रक्तदात्याच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू तरळले. रक्तदान करणाऱ्यांप्रती असलेले त्यांचे प्रेम, आत्मीयता आणि कृतज्ञतेचा भाव हे त्यांच्या हृदयातील समाजसेवेचे खरे प्रतिबिंब ठरले.

"नेता तोच जो लोकांमध्ये मिसळतो, लोकांशी एकरूप होतो" हे वाक्य त्या दिवशी अक्षरशः सत्य ठरले.

आण्णा फक्त मंचावरून बोलणारे नेते नाहीत, तर सामान्य कार्यकर्त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याचा अभिमान वाढवणारे नेते आहेत, हे या प्रसंगातून पुन्हा एकदा दिसून आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे श्री दत्तात्रय महादेव कोल्हे आणि सौ. धनश्रीताई दत्तात्रय कोल्हे यांची प्रेरणादायी उपस्थिती. त्यांच्या प्रेरणेने अनेक युवक-कार्यकर्त्यांनी रक्तदानाचा संकल्प केला. दत्ताभाऊ कोल्हे सांगितले की, "आपल्या एका थेंबामुळे कोणाचं तरी जीवन वाचतं... हीच खरी पूजा आणि हीच खरी सेवा आहे.




## एमआयटी एडीटी आणि ॲडमिशन सजेशन आयोजित करिअर गायडन्स सेमिनार संपन्न

### पिंपरी चिंचवड शहरातील शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान




**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे आणि ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'बारावी नंतर पुढे काय?' या विषयावर मोफत करिअर गायडन्स सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारला विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा तसेच पालकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. तसेच या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरातील तज्ञ शिक्षकांना 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

या सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना एमआयटी एडीटी विद्यापीठाचे विद्यार्थी कार्य चे सहाय्यक संचालक डॉ. उल्हास माळवदे व सहाय्यक प्राध्यापक डॉ. नंदकिशोर कार्लेकर आणि ॲडमिशन सजेशनचे संचालक अक्षय कुमार भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले. बारावी नंतर पुढे काय? या विषयावर मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे संपन्न झाला. यावेळी विविध कोचिंग क्लासेसचे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. उल्हास माळवदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बारावी नंतर पुढे काय? याबद्दल माहिती देत बारावी नंतर विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगत विविध अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठात ॲडमिशनसाठी असलेले निकष यावेळी समजून सांगितले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर करून नावलौकिक मिळवावे. तुम्ही वेळेचे नियोजन करून अभ्यास करा, यामुळे चांगले गुण मिळवण्यास मदत होईल. त्याचप्रमाणात अभ्यास करताना रिव्हिजन सुरु ठेवा. काही विद्यार्थी परीक्षेच्या एक दिवस अगोदर रिव्हिजन करतात, मात्र तुम्ही पाहा, जे टॉपर विद्यार्थी आहेत, त्यांची अभ्यास करण्याची पद्धत आणि आपली पद्धत कशी आहे. तसेच विद्यार्थ्यांनी बारावी नंतर कोणते अभ्यासक्रम निवडावे? कोणते महाविद्यालय निवडावे? या बद्दल माहिती देत प्रवेश परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना माळवडे यांनी काही सोप्या पद्धतीने स्टेप नुसार विद्यार्थ्यांना समजून सांगितले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे करीत आप-आपली समस्या मांडली, या समस्येचे निवारण उल्हास माळवदे यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. नंदकिशोर कार्लेकर म्हणाले, "तुम्ही तुमच्या करिअरचा मार्ग ठरवत असताना काही गोष्टी लक्षात ठेवा, मशीन कसे शिकतात, डेटा निर्णय कसा बदलतो किंवा मोबाइल ॲप्स लोकांचे जीवन कसे सुलभ करतात, या गोष्टींची आवड असेल तर तीच दिशा निवडा. स्पेशलायझेशन करा म्हणजे तुमच्या आवडीला दिशा द्या, ज्यात तुमची आवड असेल, तीच दिशा निवडा, याने तुमच्या करियरला योग्य वळण मिळेल. प्रगत तंत्रज्ञान शिकण्यापूर्वी गणित, भौतिकशास्त्र आणि कोअर प्रोग्रॅमिंग या विषयांमध्ये तुमचा पाया मजबूत असावा. फक्त आजची नोकरी नव्हे, तर दीर्घकालीन दृष्टी ठेवा: आज जे तंत्रज्ञान शिकत आहात (AI, Edge Computing, Blockchain) ते पुढील दशकात जगाच्या मूलभूत प्रणालीचा भाग होणार आहे. म्हणून तुमचा करिअर फक्त 2025 साठी नव्हे, तर भविष्यासाठी घडवा. सतत शिकत राहा: तंत्रज्ञान सतत बदलत असते. पहिल्या वर्षी शिकलेले तिसऱ्या वर्षी बदलू शकते. त्यामुळे सतत शिकण्याची वृत्ती ठेवा. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत संशोधन सुविधा, उद्योग सहकार्य, मार्गदर्शन व प्लेसमेंट सहाय्य या गोष्टी देखील महत्त्वाच्या आहेत आणि एमआयटी एडीटी या बाबतीत सक्षम असल्याचे म्हंटले आहे. पुढे मार्गदर्शन करताना अक्षयकुमार भंडारी यांनी सीईटी आणि जेईई अभ्यासक्रमाबद्दल माहिती संपूर्ण प्रवेशप्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. सीईटी आणि जेईई अभ्यासक्रम अंतर्गत कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा आणि ते कसे निवडायचे? याबाबत माहिती दिली. यावेळी त्यांनी इंजिनीरिंग अभ्यासक्रम संदर्भात प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच जेईई अभ्यासक्रमात कोणकोणत्या गोष्टी महत्वाच्या असल्याचे सांगितले.

यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्याला येणाऱ्या अभ्यासाविषयी समस्या संदर्भात मान्यवरांना प्रश्न उत्तरे करत आपापल्या समस्याचे निराकरण करून घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरिता ॲडमिशन सजेशनचे आकाश भंडारी, संदेश भंडारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमराज नाडे यांनी केले तर आभार अक्षय भंडारी यांनी व्यक्त केले.

### शहरातील शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान

**पिंपरी चिंचवड शहरातील तज्ञ शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये चिंचवड येथील चाटे कोचिंग क्लासचे संचालक प्रा. विजय बोबडे सर, ओम फिनिक्स कोचिंग क्लासेसच्या संचालिका फुंदे मॅडम, निगडी-रावेत येथील चाटे कोचिंग क्लासचे संचालक सावंत डीजे, ओमकार मॅथ अकॅडमी संचालक वाळुंज सर, थेरगाव येथील चाटे कोचिंग क्लासेस चे प्राध्यापक सचिन निंजवते, साने चौक येथील ओम फिनिक्स कोचिंग क्लासेस चे घोंगडे सर तसेच निगडी येथील ओम फिनिक्स कोचिंग क्लासचे नितेश शिरसाठ यांचा गुरु गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आप-आपले मनोगत व्यक्त केले.**

## थोडक्यात पण महत्त्वाचे




## धरण परिसरातील ऐतिहासिक बौद्ध विहार पाडल्याचा आरोप


- भीमसैनिकांकडून तीव्र निषेध
- शाखा अभियंत्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी
- पोलिसांकडून चौकशीचे आश्वासन
- जाणीवपूर्वक बौद्ध विहार पाडल्याचा समाजबांधवांचा आरोप

पुणे (आरंभ पर्व) : खडकवासला धरण परिसरातील ऐतिहासिक बौद्ध विहारावर अतिक्रमण कारवाईच्या नावाखाली बुलडोझर चालवण्यात आल्याचा आरोप होत असून या प्रकाराने सर्व समाज बांधवांच्या धार्मिक आणि सामाजिक भावना खोलवर दुखावल्या . याबद्दल सदर शाखा अभियंत्यावर अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल करावा अशी तीव्र मागणी भीमसैनिकांनी केली आहे. पाटबंधारे विभागाच्या अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये ऐतिहासिक बौद्ध विहार पाडण्यात आले. त्या घटनेविरोधात आज भीमसैनिकांनी एकत्र येत नांदेड सिटी पोलीस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते. त्यांनी शाखा अभियंत्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आणि "धार्मिक स्थळांवर अन्याय चालणार नाही" अशा घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान वरिष्ठ पोलीस अधिकारी परमार व पोलीस निरीक्षक अतुल बोस यांच्या उपस्थितीत समाज बांधवांनी निवेदन सादर केले. त्यावर पोलिसांनी घटनेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. याप्रसंगी उपस्थित आंदोलकांनी सांगितले की, "खडकवासला धरण परिसरातील बौद्ध विहार हा केवळ वास्तू नसून तो आमच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि श्रद्धेचा प्रतीक आहे. अशा ठिकाणावर कारवाई करणे म्हणजे समाजाच्या भावना दुखावण्यासारखे आहे." दरम्यान, या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून पोलीस प्रशासनाने बंदोबस्त वाढवला आहे. भीमसैनिकांनी इशारा दिला आहे की "जर दोषींवर कारवाई झाली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल."

## देशातील सर्वात मोठा पेट फेस्टिव्हल 'पेट फेड 2025' 22-23 नोव्हेंबर रोजी



पुणे (आरंभ पर्व) : देशातील सर्वात मोठा पेट फेस्टिव्हल - पेट फेड - आपल्या 11व्या पर्वासह पुन्हा एकदा भव्यतेने परतला आहे. सलग दुसऱ्या वर्षी पुणे शहरातून या पर्वाची सुरुवात होत असून, हा उत्सव 22 आणि 23 नोव्हेंबर 2025 रोजी डेक्कन कॉलेज ग्राउंड, पुणे येथे पार पडणार आहे. यंदा हा अनुभव अधिक मोठा, आकर्षक आणि "पॉसम" ठरणार आहे. रॉयल कॅनिन, ड्रूल्स आणि बोलर्स यांच्या सहकार्याने आयोजित पेट फेड 2025 देशातील चार प्रमुख शहरांमध्ये - पुणे, दिल्ली, बेंगळुरू आणि मुंबई - होणार आहे. मानव आणि त्यांच्या पाळीव प्राण्यांमधील अनोखा बंध साजरा करण्यासाठी हजारो प्राणीप्रेमी एकत्र येणार आहेत.







# नडणारा नाही लढणारा निवडा!

## पुणे महानगरपालिकेच्या नगरसेवक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर...



### पुणेकरांनी काय पाहून निर्णय घ्यावा?

- **उमेदवाराचे पूर्वीचे कामकाज**
  त्याने आपल्या भागासाठी किंवा समाजकार्यासाठी काय केले आहे?
- **जनसंपर्क आणि उपलब्धता**
  तो नागरिकांमध्ये मिसळतो का? समस्यांकडे लक्ष देतो का?
- **धोरणात्मक दृष्टी**
  केवळ घोषणाबाजी नव्हे, तर येत्या ५ वर्षांत भागाचा काय विकास होईल याची स्पष्ट योजना.
- **विकासासाठीचा ट्रॅक रेकॉर्ड**
  रस्ते, पाणी, आरोग्य, स्वच्छता यावर त्याने किती काम केले?
- **प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता**
  नेता विश्वसनीय असावा. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी कटिबद्ध असावा.

**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी नगरसेवक पदाच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून विविध पक्षांचे इच्छुक उमेदवार मतदारसंघात फिरत आहेत. पुण्यासारख्या वाढत्या, आधुनिक होत असलेल्या महापालिकेत सशक्त नेतृत्व, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांची खरी काळजी घेणारा प्रतिनिधी निवडणे ही काळाची गरज बनली आहे.

**आज सर्वात जास्त गरज आहे ती "लोकांना नडणारा नव्हे, तर लोकांसाठी लढणारा उमेदवार" निवडण्याची.**

निवडणूक आली की वचनांची बरसात होते. पण प्रत्यक्ष कामाच्या वेळी काही लोक गायब होतात. त्यामुळे पुणेकरांनी या वेळेस हुशारीने मतदान करत भविष्य घडवणारा उमेदवार निवडणे महत्त्वाचे आहे.

**पुण्याच्या नागरिकांना कोणता नेता हवा?**

**१) नागरिकांसाठी लढणारा – नडणारा नव्हे**

- अनेक वेळा अधिकारी, कंत्राटदार किंवा राजकीय दबावामुळे नागरी सुविधा रखडतात. अशावेळी तुमच्या भागाचा नगरसेवक ठामपणे आवाज उठवणारा हवा.
- रस्ते, पाणी, वाहतूक, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी महापालिकेत ठाम भूमिका घेणारा
- नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ ॲक्शन घेणारा
- प्रशासनासमोर निडरपणे उभा राहणारा

**२) स्वच्छ कामकाज असलेला उमेदवार**

- स्वच्छ प्रतिमा, भ्रष्टाचारापासून दूर असलेला आणि विकासकामांना प्राधान्य देणारा उमेदवार महत्त्वाचा.
- निधी पारदर्शकपणे खर्च करणारा
- कामे वेळेवर पूर्ण करणारा
- फक्त निवडणुकीतच नाही, पूर्ण ५ वर्षे सक्रिय राहणारा

**३) स्थानिक प्रश्नांची जाण असलेला**


- नगरसेवक फक्त चेहरा नसतो, तो तुमच्या भागाचं भविष्य ठरवतो.
- स्थानिक वाहतूक कोंडी, पाणी कपात, नालेसफाई, सार्वजनिक आरोग्य
- शाळा, बागा, रस्ते, सार्वजनिक दिवे, कचरा डेपो
- या सर्वांचे ज्ञान असलेला उमेदवार अधिक सक्षम ठरतो.

**४) तरुण आणि अनुभवी नेतृत्वाचा समतोल**

- नवीन विचारांची गरज आहे, पण अनुभवाशिवाय प्रशासन हाताळणे अवघड. त्यामुळे दोन्ही गोष्टींचा योग्य मेळ असलेला उमेदवार पुण्याला पुढे नेऊ शकतो.

पुणे आज आयटी हब, शिक्षणाचे केंद्र, सांस्कृतिक विविधतेचा संगम आणि सतत वाढणारे शहर आहे. या शहराला दूरदृष्टी असलेले, समस्यांशी झुंज देणारे आणि नागरिकांसाठी नडणारे नेतृत्व हवे आहे. फुटपाथवरील अतिक्रमणे, रस्त्यांवरील खड्डे, कचऱ्याचे डोंगर, मेट्रो-रिंगरोडसारखे मोठे प्रकल्प, पर्यावरणाचा समतोल, वाहतूक व्यवस्थापन... या सगळ्यावर ठोस काम करणारे नेतृत्व महत्त्वाचे आहे. आगामी पालिका निवडणुकांमध्ये पुणेकरांनी राजकारणातील दिखावा किंवा भावनिक मुद्दे बाजूला ठेवून काम करणारा, जबाबदार, निडर, लोकांसाठी उभा राहणारा उमेदवार निवडावा. कारण "लोकांना नडणारा नाही... लोकांसाठी लढणारा उमेदवार निवडा!" याच घोषणेसह या निवडणुकीत पुणेकरांनी आपल्या नागरिकहित जपणाऱ्या उमेदवाराला साथ देणे आवश्यक आहे.

## भारतात्मा वेद पुरस्कार सोहळा १७ नोव्हेंबर रोजी पुण्यात





- **भारतातील वैदिक परंपरांच्या जतन आणि शिक्षणासाठी उत्कृष्टतेचा होणार गौरव**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वर्गीय श्री अशोकजी सिंघल जी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या भारतात्मा वेद पुरस्काराचे वितरण १७ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे. पुण्यातील दादासाहेब दरोडे सभागृह, आगरकर रोड, बीएमसीसी कॉलेज जवळ , शिवाजीनगर येथे होणाऱ्या समारंभात परमपूज्य स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत आणि परमपूज्य आचार्यजी श्री प्रद्युम्नजी महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. भारतात्मा वेद पुरस्काराच्या माध्यमातून वैदिक शिक्षण आणि विद्वत्तेचा गौरव करण्यात येतो.

विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक सदस्य असलेल्या स्व. सिंघल यांनी श्रीराम जन्मभूमी चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी दोन दशकांहून अधिक काळ काम केले. ते भारताच्या प्राचीन ज्ञानाचे एकनिष्ठ अनुयायी होते तसेच वैदिक ज्ञान परंपरा आणि गुरुकुल शिक्षण प्रणालीच्या पुनरुज्जीवन आणि प्रसारासाठी अत्यंत कटिबद्ध होते. स्व. सिंघल यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात वेदांचा अभ्यास आणि आचरण यांचे जतन व त्याला प्रोत्साहन देण्यासाठी अमूल्य योगदान दिले.

भारतात्मा वेद पुरस्काराचे गेल्या आठ वर्षांपासून दरवर्षी प्रदान केला जात असून हे त्याचे नववे वर्ष असून आहे. तीन श्रेणींमध्ये असामान्य योगदानांचा या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव करण्यात येतो.

- उत्कृष्ट वैदिक विद्यार्थी - ₹३ लाख रोख
- आदर्श वैदिक शिक्षक - ₹५ लाख रोख बक्षीस
- उत्कृष्ट वैदिक संस्था - ₹७ लाख रोख बक्षीस

प्रत्येक पुरस्कृताला प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्हही प्रदान करण्यात येईल.

या समारंभात वेद अर्पित जीवन सन्मान म्हणजेच जीवनगौरव वैदिक समर्पण पुरस्कारही प्रदान करण्यात येणार आहे. वैदिक ज्ञानाचा अभ्यास, अध्यापन आणि सराव करण्यासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या विद्वानांना हा सन्मान दिला जातो. रोख ५ लाख रुपये आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

याच समारंभात भारतात्मा वेद पुरस्कार २०२५ च्या विजेत्यांची घोषणा केली जाईल.



## संगणक प्रमाणपत्र वाटप संपन्न

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दिनांक 10 नोव्हेंबर 2025 रोजी महात्मा फुले विकास महामंडळ तर्फे अनुसूचित जाती (एससी) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण व तीन हजार रुपये स्कॉलरशिप मंडळ तर्फे देण्यात येते या मंडळा अंतर्गत TM e2E Academy pvt ltd Hyderabad व ज्ञानसंकल्प सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य तर्फे 60 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली त्यातील 40 विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.स्वातीताई पवार विद्यमान सरपंच गोपाळवाडी दौंड या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी नानवीज पोलीस ट्रेनिंग सेंटर पीआय श्री.नितीन बोधे सर यांनी संगणक साक्षर व्हायला हवे संगणक शिकणे ही काळाची गरज आहे जगाबरोबर चालायचे असेल तर संगणक शिकणे अतिशय आवश्यक आहे असे आव्हान या कार्यक्रमा वेळी केले त्यानंतर मंगेश मेमोरियल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सुरवडे सर यांनी संगणका बद्दलचे महत्त्व जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांना संबोधित केले तसेच या कार्यक्रमाच्या वेळी मा. सरपंच श्री जयसिंग दरेकर गोपाळवाडी ,ग्रामपंचायत सदस्य सौ.वैशालीताई शिंदे पत्रकार भारतीय पत्रकार संघाचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवलकर,,गोपाळवाडी ग्रामपंचायतचे मा. तंटामुक्त अध्यक्ष भीमराव चोरमले ,रोटरी क्लबचे सदस्य चांगदेव शेलार ,श्री गणेश हाके श्री सुरेश काळे श्री रघुनाथ सुळ श्री शरद धेंडे , श्री अजय बनसोडे प्रथमेश रणदिवे इत्यादी मान्यवरांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दाखवली या कार्यक्रमाचे आयोजन श्री सदाशिव रणदिवे संस्थापक अध्यक्ष यांनी केले यावेळी संस्थेची माहिती देण्यात आली.

# "पोटावर पाय देऊ नका हो मायबाप सरकार !"

## *खडकवासला चौपाटीवरील महिला भगिनींची सरकारकडे आर्त विनंती*

**लक्ष्मण साबळे**



"पोटावर पाय देऊ नका हो मायबाप सरकार... आमचं जगणं बंद करू नका. आमचं आयुष्य पुन्हा उभं राहू द्या..." प्रशासनाकडून काही शर्ती घालून परवानगी मिळेल का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**खडकवासला(दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरण परिसरात पाटबंधारे विभागाने नुकतीच अतिक्रमण हटाव कारवाई केली. या कारवाईनंतर खडकवासला चौपाटीवर रोजीरोटी मिळवणाऱ्या अनेक गरीब महिला भगिनींचं जगणं उद्ध्वस्त झालं आहे. हातगाड्या, चहाचे स्टॉल, भेळ, खेळणी, आईस्क्रीम विकून संसार चालवणाऱ्या या महिलांचे व्यवसाय एका क्षणात नष्ट झाले.

"आम्ही अतिक्रमण केलं नाही, फक्त पोटाची भूक भागवण्यासाठी काम केलं. चार घास खाऊ द्या हो मायबाप सरकार..." अशी आर्त हाक त्यांनी दिली आहे. कोणतीही नोटीस न देता पाटबंधारे विभागाने ही कारवाई केली, असा त्यांचा आरोप आहे. सन 2010 सालापासून या सर्व महिला उपजीविका करण्यासाठी छोटे-मोठे व्यवसाय करत आहेत. एवढ्या वर्षात मोठ्या प्रमाणात ही पहिल्यांदाच कारवाई झाल्याने सर्वजण हवालदिल झाले आहेत. या महिलांचे डोळे पाणावलेले आहेत. अनेकांच्या हातात काम नाही, घरात लेकरांच्या पोटाला घास नाही. "आम्ही पुन्हा अतिक्रमण करणार नाही, पण कामाची जागा द्या. आम्हाला पुन्हा उभं राहू द्या, एवढंच मागतो आम्ही," अशी त्यांनी शासनाला विनंती केली आहे.

पाटबंधारे विभाग, सिंचन विभाग आणि पुणे महानगरपालिका प्रशासन यांच्याकडे त्यांनी पुनर्वसनासाठी वारंवार मागणी केली आहे. मात्र, अद्याप कुणीच दखल घेतलेली नाही. "श्रीमंतांसाठी वेगळे नियम आणि आमच्यासाठी वेगळे का? आमचं पोट चालवणं गुन्हा आहे का?" असाही प्रश्न त्यांनी प्रशासनाला विचारला आहे.

आज त्या सर्व महिला चौपाटीच्या ओस पडलेल्या जागेकडे पाहत शांत बसलेल्या दिसतात. पण त्यांच्या शांततेतून एक आवाज वारंवार उमटतो आहे.

# समाजसेवेसाठी झटणारे दांपत्य : रमेशबापू आणि सौ. सविता गायकवाड








**(दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरात समाजसेवा, माणुसकी आणि जनतेशी असलेली बांधिलकी या तीनही गुणांनी वेगळी ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश बापू गायकवाड आणि त्यांची पत्नी सौ. सविता गायकवाड.

हे दोघेही जनतेसाठी, समाजासाठी आणि विकासासाठी झटणारे प्रेरणादायी दाम्पत्य म्हणून ओळखले जातात.

रमेश बापू गायकवाड यांनी गेल्या काही वर्षांत अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्यांनी समाजातील गोरगरिबांच्या मदतीसाठी सढळ हातांनी योगदान देत लोकांमध्ये एक वेगळी विश्वासार्ह प्रतिमा निर्माण केली आहे.

त्यांनी वारकरी संस्थेला अकरा हजार रुपयांची मदत, पूरग्रस्त महिलेचं घर पडल्यानंतर एक लाख रुपयांची आर्थिक मदत, व्यसनमुक्ती केंद्रात दूध वाटप, बुद्धश्रमातील वृद्धांना फळं वाटप, रक्षाबंधनानिमित्त महिलांना साड्या वाटप आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवेचा आदर्श घालून दिला आहे.

भाजपचे मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी एक सामाजिक कार्य सुचवले होते. त्यासाठी रमेश बाबू गायकवाड यांनी कोणतेही क्षणाचा विचार न करता एक लाख रुपयांची भरीव मदत दिली. त्यामुळे त्यांची सर्वत्र हक्काचा बापू म्हणून ओळख..

रमेश बापू सांगतात, "मी सत्तेसाठी नव्हे, तर समाजासाठी काम करतो. माझं ध्येय म्हणजे प्रत्येक घरात आनंद आणि आत्मविश्वास निर्माण करणं. पक्ष जो निर्णय घेईल, तो मी मान्य करणार आहे. पक्षाकडून संधी मिळाल्यास मी आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीत जनतेच्या सेवेसाठी उभा राहणार आहे. अन्यथा पक्ष सांगेल ती जबाबदारी घेणार आहे"

त्यांच्या या कार्यात सौ. सविता गायकवाड यांची साथ ही त्यांच्या शक्तीचा पाया ठरली आहे. सौ.सविता गायकवाड या महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जातात.

"गायकवाड दाम्पत्य म्हणजे आमच्यासाठी प्रेरणा आहे. रमेश बापू नेहमी मदतीला धावून येतात, त्यांच्या पत्नी ही महिलांसाठी उपलब्ध असतात. दोघेही समाजासाठी नि:स्वार्थ भावनेने कार्य करतात." असे अनेक नागरिकांनी मत व्यक्त केले आहे .

गायकवाड पती-पत्नी समाजसेवेसाठी कटिबद्ध असून, जनतेच्या सेवेसाठी एकत्रित झटणाऱ्या या जोडीने खडकवासला परिसरात सकारात्मक बदल आणि नवा विश्वास निर्माण केला आहे.

त्यांचं काम हे केवळ राजकारणापुरतं मर्यादित नसून, ते प्रत्येक समाजघटकाशी जोडलेलं आहे.

राजकारणापेक्षा समाजसेवेला प्राधान्य देणारे रमेश बापू यांनी सर्वांच्या मनात आपले घर निर्माण केले आहे.

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीमध्ये त्यांच्याकडेही सर्वांचे लक्ष असणार आहे. नुकताच त्यांचा लोकशाही न्यूजतर्फे सन्मान करण्यात आला आहे. याशिवाय दैनिक आरंभपर्व राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्य पुरस्कार देण्यात आला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.